महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२२-२३/50 दिनांक:- - 4 JAN 2023

प्रति,
प्राचार्य /संचालक,
शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,
पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :-**डीबीटी पोर्टलव्दारे शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्याबाबत तसेच संस्थांच्या लॉगीन ला प्रलंबित असलेले अर्ज मंजूरीस्तव पाठविण्याबाबत.**

आपले सरकार महाडिबीटी पोर्टल (संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना
२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना
३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना .

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता, महाडिबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज (नवीन /नुतनीकरण ) भरण्याची प्रक्रिया **दि. 21 सप्टेंबर २०२२ पासून** सुरू करण्यात आलेली आहे. परंतु संस्थांच्या लॉगीन मध्ये **एकुण ५७६०** विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

तरी, त्याअनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष 2022-23 करिता आपल्या संस्थेतील शिकणा-या उपरोक्त योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवरील अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरुन घेण्याबाबत संस्थास्तरावरुन वेळोवेळी विद्यार्थ्यांना सुचना देण्यात यावे. व संस्था स्तरावर प्राप्त झालेले अर्ज, **संस्थेला दिलेल्या दोन्ही लॉगीन (Principal & Clerk Login ) मधून संबंधित योजनेंच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करून अचुक पात्र असलेले अर्ज मंजूरीस्तव पाठविण्यात यावे. आपण पाठविलेले अर्ज संबंधित योजनेंकरिता पात्र नसल्याचे आढळल्यास, तर असे अर्ज परत (Revert) न करता विभागीय स्तरावरील आपणास कोणत्याही प्रकारची सुचना न देता थेट नामंजूर करण्यात येईल, याची सर्व प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

**(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर